तात्काळ
=======

जा.क्र.माध्य-३[१४]नमाशा/मान्यता/ ग्रीन/९३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय
दिनांक:- ९ / ७ /१९९३

12 JUL 1993

प्रति,

सचिव,

गणेश मोफत वाचनालय,
कांदळगाव, जिल्हा पुणे

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ:- शासन पत्र क्र एसएसएन/१०९३/३४५०/माशि/१ दिनांक २ जुलै १९९३

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदिला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासून विना अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर पावरनगी देण्यात येतआहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे[उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतइ.]काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.]फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही.अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याचे देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज]कायदा१९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.